# NOT ME BUT YOU

21.08.2020

**जनजागृती** • ऑनलाइन व्याख्यानात डॉ.डी. एस.राणे यांचे प्रतिपादन, बोदवड महाविद्यालयाचा उपक्रम

## अवयवदान ठरू शकते इतरांसाठी आशेचा किरण

**प्रतिनिधी** | बोदवड

मृत्यू पश्चात एक देह (शरीर) सात जणांच्या आयुष्यात एक आशेचा किरण ठरू शकतो. तर ३५ लोकांच्या आयुष्याचा दर्जा सुधारू शकतो. मात्र आपल्या समाजात अवयव दानाविषयी फारशी जागृती नसल्याने, कित्येक रुग्ण वर्षानुवर्षे अवयवांच्या प्रतीक्षेत आहेत. अवयवदान हे केवळ डोळे किंवा किडनी यापुरते मर्यादित नसून शरीराचे सुमारे १० विविध अवयव आपण दान करू शकतो, असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या, राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी जिल्हा समन्वयक व दादासाहेब देविदास नामदेव भोळे महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे प्रा.डॉ.डी.एस. राणे यांनी केले. बोदवड महाविद्यालयात आयोजित ऑनलाइन व्याख्यानात ते बोलत होते.

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे अध्यक्ष प्रा.अरविंद चौधरी व सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. पंकजकुमार नन्नावरे यांच्या मार्गदर्शनाखाली बोदवड महाविद्यालयातील एनएसएस विभागाने विविध उपक्रम राबवले. त्यात निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला अशा स्पर्धा झाल्या. त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून डॉ. डी. एस. राणे यांचे अवयवदान या विषयावर ऑनलाइन व्याख्यान आयोजित केले होते. उपप्राचार्य प्रा. डी. एस. पाटील, डॉ. अनिल बारी, डॉ. माधव वराडे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्ना जावारास, डॉ. ईश्वर म्हसलेकर, डॉ. वंदना बडगुजर यांनी सहकार्य केले.




महाविद्यालयातील एनएसएस स्वयंसेवकांनी चित्रांद्वारे अवयव दानाची जनजागृती केली.

### स्वत:हून सहभागी व्हा

*महाअवयवदान दिनानिमित्त १३ ते २० ऑगस्ट यादरम्यान अवयवदानासंबंधी विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. मृत्यूनंतर कुणाचे तरी जीवन फुलवूया, असा जर विचार मनात आणला तर समाजातील हजारो नागरिक या अवयवदान अभियानात स्वत:हून सहभागी होतील.*

**- डॉ. अनिल बारी,** कार्यक्रम अधिकारी, रासेयो

### गैरसमज दूर करा

*शरीर हे क्षणभंगूर आहे, मृत्यूनंतर सारे नष्ट होते. मात्र अवयरुपी जिवंत रहायचे असेल तर 'अवयव दान' करा. अवयवदाना विषयीचे गैरसमज दूर करून, मृत्यू पश्चात तुम्ही काही जणांचे आयुष्य थोडे सुसह्य करू शकता.* **- प्रा.अरविंद चौधरी,** प्राचार्य